महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# वासरांची निगा





वासरांची मरतूक ही पशुपालकांपुढे मोठी समस्या आहे. वासरांची योग्य निगा घेतल्यास ही समस्या कमी करणे शक्य आहे. बालवयापासूनच योग्य निगा घेतल्यास वासरे सुदृढ होतात, लवकर वयात येतात. किफायतशीर दुग्धव्यवसायासाठी वासरांची योग्य निगा घेणे गरजेचे आहे.

१) जन्मानंतर लगेचच नाका – तोंडातील तसेच डोळे व कान यामध्ये अडकलेला चिकट स्त्राव स्वच्छ कापडाने पुसून घ्यावा.

२) कोवळी खूर समतल खुडावे.

३) चाटण्यासाठी मातेपुढे ठेवावे. जर चाटत नसेल तर स्वच्छ खरखरीत कापडाने शरीर पुसावे.

४) श्वसनास अडथळा येत असेल तर छातीवर हाताच्या पंजाने परत – परत हलका दाब देवून कृत्रिम श्वासोच्छवास द्यावा.

५) जन्मावेळच्या वजनाची नोंद घ्यावी.

६) नाळेला पोटापासून १ इंच अंतरावर टिंक्चर आयोडिनमध्ये बुडविलेल्या दोऱ्याने घट्ट बांधून त्याखाली १ इंच अंतरावर निर्जंतूक कात्रीने वा ब्लेडने कापावे.

७) कापलेल्या ठिकाणी टिंक्चर आयोडिनचा बोळा किंवा प्रतिजैविक मलम लावावा.

८) अर्ध्या तासाच्या आत चिक अवश्य पाजावा.

९) वजनाच्या एक दशांश भाग चिक दिवसातून ३ ते ४ वेळा विभागून द्यावा. जन्मवेळी सर्व सामान्य वासरांचे वजन २० ते २५ किलो असते, म्हणून २ ते २.५ किलो चिक दिवसातून ३ ते ४ वेळा विभागून द्यावा.

१०) कानात किंवा गळ्यात बिल्ला लावून ओळख खुण करावी.

११) पक्षी, कुत्रे आदीपासून संरक्षण करावे.

१२) ऊन, पाऊस आणि थंडीपासून संरक्षण करावे.

१३) जागा स्वच्छ व कोरडी ठेवावी.

१४) वयाच्या चौथ्या आठवड्यापासून चांगल्या प्रतिचा हिरवा (एकदल व द्विदल २:१ प्रमाण) चारा द्यावयास सुरूवात करावी.

१५) वासरू एक महिन्याचे झाले की १ छटाक खुराक द्यावा व त्यानंतर तो हळूहळू वाढवत न्यावा.

१६) वयाच्या ३ ते ७ व्या दिवशी जंतनाशकाची पहिली मात्रा द्यावी. त्यानंतर २१ दिवसाच्या अंतराने जंतनाशन करावे.

१७) तीन महिने वयाच्या वासरांना घटसर्प, फऱ्या व लाळ्या खुरकूत वरील लसी टोचून घ्याव्यात.

**जन्मल्याबरोबर वासरास चिक पाजणे योग्य।**
**होईल झपाट्याने वाढ, जपेल आरोग्य॥**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर